ललित संगीताची वाटचाल याचा जो कोणी अभ्यास करील त्याला तीन दशकातील या गीताच्या लोकप्रियतेचा मागोवा डोळसपणे घ्यावाच लागेल. आकाशवाणीने आम्हाला काय दिले? असा विचार करतेवेळी लोकप्रियतेच्या अग्रभागी असलेल्या या गीताची, स्वररचनेची आणि गायकांची आठवण सदैव ठेवावी लागेल. खरं तरं अशा गोष्टी करु म्हटल्याने होत नसतात त्या आपोआप घडतात या गीतानेही या सर्व कलावंत मंडळींना, रसिकांना जे सर्वकाही दिले आहे ते या सहजतेतूनच.

आज २६ वर्षे श्री अरुण दाते ही स्वररचना रसिकांसमोर सादर करीत आहेत आणि रसिकजनही त्याचे उत्स्फूर्त स्वागत करीत आहेत त्याचे गुपित एकच की हे गीत, ही स्वररचना आणि हा आवाज यातील ताजेपणा जिवंत वाटतो. स्वरसाज, शब्द हे ताजेपणाची कवचकुंडल घेऊनच जन्माला आलेले आहेत त्यामुळेच हा स्वरवीतपणा अन् ताजेपणा सदैव असाच राहणार आहे. रौप्य महोत्सवच काय पुढील येणाऱ्या सर्व महोत्सवातून रसिकांची हीच 'दाद' या गीताला श्री. अरुण दाते यांना मिळणार आहे. म्हणूनच या गीतातील शब्दातूनच सांगावे वाटते

"मी कशी शब्दात सांगू भावना माझ्या तुला,
तू तुझ्या समजून घे रे लाजणाऱ्या या फुला
अंतरीचा गंध माझ्या आज तू पवना वहा
तू असा जवळी रहा"

गीतातील स्त्रीच्या मनातील हे हृदगत सर्वकाही सांगून जाते.

श्री दत्ता मारुलकर
८ हरिकृपा, डहाणूकर कॉलनी, १०वा रस्ता
कोथरुड, पुणे क्र. ४११०२९